**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. महाडीबीटी-२०२३-२४/(८४७३५०-२३)/शिष्यवृत्ती शाखा/३३४१ दिनांक : ३०.१०.२०२३

**तात्काळ/अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - शिष्यवृत्ती योजनांची सन २०२३-२४ करीता महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी त्यांचे विविध अभ्यासक्रमनिहाय विविध शुल्क यांबाबतची माहिती आणि प्रोफाईल अद्ययावत करणेबाबत.**

संदर्भ : - १. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२३-२४/डीबीटी/फी मंजूरी दि. ०५.१०.२०२३.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे पत्र क्र. शै. प्रवेश /४२३२ दि. १४.१०.२०२३.
३. प्रस्तुत कार्यालयाचे परिपत्रक क्र. महाडीबीटी-२०२३-२४/(८४७३५०-२३)/शिष्यवृत्ती शाखा/ १४९२३६ दि. २०.१०.२०२३.

उपरोक्त विषयाबाबत शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या संदर्भामध्ये नमूद केलेल्या पत्रान्वये सन २०२३-२४ या वर्षाकरिता महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यासाठी त्यांचे महाविद्यालय/विद्यापीठ/संस्था यांचे महाडीबीटी पोर्टलवर प्रोफाईल अद्ययावत करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. सदरहू महाडीबीटी पोर्टलमध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या खालील एकूण १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

| अनु.क्र. | योजनांची नावे |
|---|---|
| १ | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना |
| २ | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना |
| ३ | एकलव्य आर्थिक सहाय्य |
| ४ | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (कनिष्ठ स्तर) |
| ५ | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (वरिष्ठ स्तर) |
| ६ | राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती |
| ७ | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती |
| ८ | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती |
| ९ | राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती |
| १० | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| ११ | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती |
| १२ | राज्यशासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (भाग-२) |
| १३ | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |
| १४ | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |

सन २०२३-२४ या वर्षाकरिता महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यासाठी त्यांचे महाविद्यालय/विद्यापीठ/संस्था यांचे महाडीबीटी पोर्टलवर प्रोफाईल अद्ययावत करण्याबाबत प्रस्तुत कार्यालयाच्या दि. १०.१०.२०२३ च्या परिपत्रकान्वये सूचना दिलेल्या आहेत.


सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विद्यापीठाकडून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता जे शैक्षणिक शुल्क आकारणी केले आहे. त्याबाबतचे अभ्यासक्रमनिहाय तसेच बाबनिहाय माहिती प्राप्त झाली आहे. त्याबाबतची माहिती महाडीबीटी पोर्टलवर प्राचार्य लॉगीन वरुन फी डिटेल्स टॅब मध्ये अभ्यासक्रमनिहाय तसेच बाबनिहाय सोबत जोडलेल्या फी स्ट्रक्चर नुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता शुल्कांची अचूक माहिती भरुन मंजूरीस्तव पाठविण्याबाबत प्रस्तुत कार्यालयाच्या दि. २०.१०.२०२३ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे.

या विभागाच्या अधिपत्याखालील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संलग्नित सन २०२३-२४ या वर्षासाठी जे शुल्क निर्धारित केलेले आहेत त्याप्रमाणे सर्व महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांच्या शुल्क मान्यता खाली नमूद केल्याप्रमाणे कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत.

| Time | Date | Taluka | Total Colleges | Venue |
|---|---|---|---|---|
| 10.00 a.m. to 5.00 p.m. | 31.10.2023 | akole, Kopargaon, newasa | 21 | पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर, ता. राहाता, जि. अहमदनगर |
| 10.00 a.m. to 5.00 p.m. | 01.11.2023 | rahata, rahuri, shrirampur | 30 | पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर, ता. राहाता, जि. अहमदनगर |
| 10.00 a.m. to 5.00 p.m. | 02.11.2023 | Nagar, Sangamner, | 51 | पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर, ता. राहाता, जि. अहमदनगर |
| 10.00 a.m. to 5.00 p.m. | 03.11.2023 | Shevgaon, karjat, jamkhed | 29 | पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर, ता. राहाता, जि. अहमदनगर |
| 10.00 a.m. to 5.00 p.m. | 04.11.2023 | pathardi, parner, shrigonda | 27 | पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर, ता. राहाता, जि. अहमदनगर |
| 10.00 a.m. to 5.00 p.m. | 06.11.2023 | Pimpari Chinchwad | 54 | डॉ. डी.वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपरी, पुणे |
| 10.00 a.m. to 5.00 p.m. | 07.11.2023 | Ambegaon, Khed | 38 | डॉ. डी.वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपरी, पुणे |
| 10.00 a.m. to 5.00 p.m. | 08.11.2023 | Junnar, Mawal | 29 | डॉ. डी.वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपरी, पुणे |
| 10.00 a.m. to 5.00 p.m. | 09.11.2023 | SHIRUR | 20 | डॉ. डी.वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपरी, पुणे |
| 10.00 a.m. to 5.00 p.m. | 20.11.2023 | peth, dindori, tryambakeshwar, chandwad | 40 | के.व्ही.एन. नाईक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कॅनडा कॉर्नर, नाशिक |
| 10.00 a.m. to 5.00 p.m. | 21.11.2023 | surgana, kalwan, baglan, nandgaon, deola, dadra nagar haveli | 38 | के.व्ही.एन. नाईक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कॅनडा कॉर्नर, नाशिक |
| 10.00 a.m. to 5.00 p.m. | 22.11.2023 | malegaon | 35 | के.व्ही.एन. नाईक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कॅनडा कॉर्नर, नाशिक |
| 10.00 a.m. to 5.00 p.m. | 23.11.2023 | Nashik city | 75 | के.व्ही.एन. नाईक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कॅनडा कॉर्नर, नाशिक |
| 10.00 a.m. to 5.00 p.m. | 24.11.2023 | Sinnar, igatpuri, Niphad | 20 | के.व्ही.एन. नाईक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कॅनडा कॉर्नर, नाशिक |

पुणे शहर आणि पुणे ग्रामीण मधील उर्वरित  महाविद्यालयांची फी ॲप्रुवल बाबत लवकरच परिपत्रकाद्वारे कळविण्यात येणार आहे. तरी सर्व महाविद्यालयांनी उपरोक्त नमूद ठिकाणी महाडीबीटी पोर्टल फी ॲप्रुवल कार्यशाळेस नियोजित दिनांकास आणि वेळेस आवर्जून उपस्थित रहावे.

आपला विश्वासू



**(डॉ. किरणकुमार बोंदर)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे